महाराष्ट्र शासन

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र.वैशिप्र-१०२४/प्र.क्र.४१/नीट युजी २०२४/प्रवेश सुचना/१६६४ दिनांक : १४/०९/२०२४

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व शासकीय, महानगरपालिका, खाजगी, अल्पसंख्यांक,
आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी पदवी अभ्यासक्रमांची महाविद्यालये

**विषय: नीट युजी - २०२४ राज्य स्तरीय कोटा उमेदवारांच्या प्रवेशाबाबत महत्त्वाच्या सूचना.**

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता नीट युजी - २०२४ या पात्रता प्रवेश परीक्षेद्वारे जाहीर केलेल्या गुणवत्ता यादीनुसार आरोग्य विज्ञान आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी पदवी अभ्यासक्रमांच्या राज्य स्तरीय कोट्याच्या निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर प्रवेश यादीनुसार उमेदवारांच्या प्रवेशाच्या वेळी करावयाच्या कार्यवाही बाबत महाविद्यालयांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) महाविद्यालयांनी विद्यार्थी प्रवेशापूर्वी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नीट युजी २०२४ च्या नियमावली पुस्तिका आणि प्रवेश प्रक्रियेबाबत वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या सूचनांचे अवलोकन करावे व त्यांचे पालन करावे.

२) विद्यार्थी प्रवेश करीता संस्थास्तरावर मा.अधिष्ठाता/प्राचार्य यांचे अध्यक्षतेखाली किमान ३ ज्येष्ठ अध्यापकांची प्रवेश पूर्व तपासणी समिती गठीत करण्यात यावी.

३) आपल्या महाविद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी College Feedback Module मधील महाविद्यालयीन लॉगीन मध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर यादीतील विद्यार्थ्यांना दिलेल्या वेळेत रुजू करून घेणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

४) सुटटीचे दिवशी महाविद्यालय प्रवेश प्रक्रियेकरीता सुरु ठेवण्यात यावे.

५) User Manual for Feedback Module मध्ये नमूद नियमांचा अभ्यास करून आपल्या महाविद्यालयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

६) या कार्यालयाकडून आपल्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या निवड यादीमधील दर्शविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवर्गानुसार संबंधित विद्यार्थ्याकडे त्याच्या प्रवर्गाची योग्य मूळ कागदपत्रे उपलब्ध असणे बंधनकारक आहे. उमेदवारांच्या प्रवर्गा (Category) नुसारच कागदपत्रांची पडताळणी होणे आवश्यक आहे. त्याचा निवड झालेला प्रवर्ग (Quota) जरी खुला (Open) असेल तरी त्याने मागणी केलेल्या मूळ प्रवर्गाची कागदपत्रे विद्यार्थ्याकडे असणे बंधनकारक आहे. सदर विद्यार्थ्याकडे प्रवर्गानुसार मूळ प्रमाणपत्र नसल्यास अशा विद्यार्थ्याबाबत User Manual for Feedback Module मध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

७) एसईबीसी प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेसाठी शासनाकडून सहा महिन्याची मुदत देण्यात आली आहे. तथापि त्यांचेकडे जात वैधता प्रमाणपत्रासाठी केलेल्या अर्जाची पावती असणे आवश्यक आहे.

८) ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेसाठी शासनाकडून सहा महिन्याची मुदत देण्यात आली आहे. तथापि त्यांचेकडे जात वैधता प्रमाणपत्रासाठी केलेल्या अर्जाची पावती असणे आवश्यक आहे.

९) एसबीसी उमेदवारांचे संदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

Applicants belonging to Special Backward Class N.B.: As per the Maharashtra government ACT NO. XXX of 2006 dated 1st August 2006 the candidate belonging to the Special Backward Category shall be considered from and out of their respective original / parent Reserved Category such as Other Backward Classes (OBC)

१०) ईबीसी, ईडब्ल्यूएस व एसईबीसी प्रवर्गातील पात्र विद्यार्थी व विद्यार्थीनींकडून प्रवेशाचे वेळी शिक्षण शुल्काबाबत आयुक्त, वैद्यकीय शिक्षण यांचे दिनांक २३/०८/२०२४ रोजीचे पत्रातील सुचनानुसार कार्यवाही करण्यात यावी.

११) निवड यादीमधील विद्यार्थांना प्रवेश देताना त्यांच्या मुळ कागदपत्रांची छाननी/पडताळणी उपरोक्त नमूद समितीने करणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी संवैधानिक आरक्षणाच्या प्रवर्गातून निवड झाले आहेत, अशा सर्व विद्यार्थ्यांकडे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र आणि आवश्यक असल्यास नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ( SC/ST सोडून सर्व उमेदवारांकडे) उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे EWS प्रवर्ग निवड झालेल्या विद्यार्थ्यांकडे राज्य शासनाच्या नमुन्यातच निर्गमित केलेले शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी वैद्य प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या EWS प्रमाणपत्रामध्ये Central List **असा शब्द** असल्यास अथवा Income & Asset Certificate ते प्रवेशासाठी ग्राह्य धरण्यात येवू नये. इतर प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येऊ नयेत.

१२) शारीरिक दृष्ट्या अपंग (PWD) असलेल्या कोट्यातून निवड झालेल्या उमेदवारांकडे मेडीकल कॉन्सिलींग कमिटी, नवी दिल्ली यांचेकडून निश्चित केलेल्या केंद्राकडून देण्यात आलेले वैद्यकीय प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. इतर कोणतेही प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही. शारीरिक दृष्ट्या अपंग असलेल्या कोट्यासोबत संवैधानिक आरक्षण असल्यास अशा विद्यार्थ्यांकडे शारीरिक दृष्ट्या अपंग असल्याचे निश्चित केलेल्या केंद्राकडून देण्यात आलेले प्रमाणपत्र, त्याचप्रमाणे संवैधानिक आरक्षणासाठी लागू असलेली योग्य ती प्रमाणपत्रे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

१३) इतर राखीव प्रवर्गामधून निवड झालेल्या (उदा.Hill Area, MKB, Defense, Minority, NRI इ.) विद्यार्थ्यांकडे माहिती पुस्तिकेतील नमुद त्या त्या प्रवार्गासाठीचे सर्व मूळ प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. अनाथ मुलांना १% समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नमुन्यामध्ये अनाथ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१४) उमेदवाराने मूळ अर्जामध्ये दर्शविलेल्या सर्व संवैधानिक आणि समांतर आरक्षणासाठीची सर्व कागदपत्रे (उमेदवाराला त्या कोट्यातून प्रवेश मिळालेला नसला तरीही) तपासण्यात यावीत. सर्व प्रवर्गाची कागदपत्रे उपलब्ध असतील तरच उमेदवारास पात्र समजण्यात यावे. जेणेकरून पुढील प्रवेश फेरीतील संबंधित उमेदवाराचा प्रवेश सुरळीतपणे पार पडता येईल. सदर उमेदवाराकडे (i) सर्वसाधारण पात्रतेसाठीची कागदपत्रे (ii) आरक्षणासाठी लागणारी कागदपत्रे यापैकी कोणतेही कागदपत्र उपलब्ध नसल्यास उमेदवारास पात्र समजण्यात येऊ नये.

१५) उमेदवाराकडे योग्य ते प्रमाणपत्र नसल्याने प्रवेश नाकारण्यात आल्यास, सदर उमेदवाराची नोंद College Feedback Module मध्ये करणे अनिवार्य आहे. जेणेकरून सदर उमेदवार आरक्षित नसलेल्या प्रवर्गातून पात्र असल्यास त्याचा पुढील प्रवेशफेरीत विचार होऊ शकेल.

१६) समितीने वरीलप्रमाणे प्रवेशासाठी आवश्यक असलेली सर्व मुळ प्रमाणपत्रांची तपासणी करून, प्रमाणपत्रे परिपूर्ण असल्याशिवाय विद्यार्थाच्या प्रवेशाबाबतची पुढील कार्यवाही करू नये. योग्य कागदपत्रांअभावी प्रवेश निश्चित करण्यात येवू नये. सर्व आवश्यक प्रमाणपत्रे परिपूर्ण असल्याशिवाय प्रवेश निश्चित केल्यास अथवा हा प्रवेश प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी रद्द केल्यास अथवा या संबंधी न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

१७) आपल्या महाविद्यालयात/संस्थेत प्रवेशासाठी येणाऱ्या विद्यार्थांचे शैक्षणिक शुल्क व अन्य शुल्क प्रत्येक फेरीच्या नमूद अंतिम दिनांकापर्यंत नियोजित वेळेपर्यंत स्वीकारण्यात यावे. शैक्षणिक शुल्क हे डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपातच स्विकारण्यात यावे. **शनिवार आणि रविवार (सुट्टीच्या दिवशी) शैक्षणिक शुल्क**

**धनादेशाद्वारे स्विकारण्यात यावे** आणि विद्यार्थ्यांना पुढील दिवसात डिमांड ड्राफ्ट देणास सांगावे. **शुल्क नियामक प्राधिकरण यांनी निश्चित केलेल्या शुल्काव्यतिरिक्त अन्य कुठल्याही प्रकारे शुल्क आकारण्यात येवू नये.**

संबंधित महाविद्यालयातील रोखापालांनी आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणारे शैक्षणिक शुल्क आणि इतर शुल्कापोटी वेगवेगळे दोन डिमांड ड्राफ्ट तो विद्यार्थी त्यांच्या महाविद्यालयातील प्रवेश निश्चित करेपर्यंत किंवा त्याने घेतलेला प्रवेश रद्द करेपर्यंत किंवा डिमांड ड्राफ्टच्या वैध कालावधीपर्यंत आपल्याकडे ठेवून घ्यावेत. डिमांड ड्राफ्ट प्राप्त झाल्यानंतर फक्त डिमांड ड्राफ्ट ची पोच पावती देण्यात यावी. प्रवेश निश्चित झाल्याशिवाय विद्यार्थ्यांस शुल्काची पावती देण्यात येवू नये. **विद्यार्थाने जर सदर महाविद्यालयातील प्रवेश रद्द करून दुसऱ्या महाविद्यालयात प्रवेश घेतला तर नियमाप्रमाणे प्रवेश रद्द करण्याचे शुल्क (रुपये १५००/-) फक्त विद्यार्थ्यांकडून रोख स्वरुपात घेऊन त्याने जमा केलेले दोनही डिमांड ड्राफ्ट त्याला परत करण्यात यावेत.**

१८) <u>Scrutiny Form संबंधी सूचना :</u>

महाविद्यालयाने College Feedback Modulle मधूनच Scrutiny Form Download करावा. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी त्याचे नावासमोर दर्शविलेला Form वापरावा.

<u>Acknowledge/ Receipt (पोहोच पावती) संबंधी सूचना :</u>

आपल्या महाविद्यालयामध्ये प्रवेशाकरिता आलेल्या विद्यार्थ्याच्या प्रवेशासंबंधीची कार्यवाही केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याला College Feedback Module मधून तयार होणारी पोहोच पावती देणे बंधनकारक राहील.

१९) <u>Status Retention Form संबंधी सूचना :</u>

a) आपल्या महाविद्यालयात उपरोक्त मुदतीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांना जर पुढील निवड फेरीत अन्य महाविद्यालयात प्रवेश बदल (Upgradation) नको असल्यास अशा विध्यार्थ्यांकडून माहिती पुस्तिकेमध्ये देण्यात आलेला Status Retention Form भरून घेण्यात यावा. सदर फॉर्म प्रत्येक फेरीच्या नोटीसमध्ये दिलेल्या अंतिम वेळेतच स्वीकारावा, त्याची नोंद राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर College Feedback Module मध्ये त्वरित अपलोड करण्यात यावा, त्याची पोहोच पावती संबंधित विद्यार्थ्यास द्यावी.

b) वरील नमूद Retention Form ची नोंद राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावरील College Feedback Module मध्ये न केल्यास विद्यार्थ्याच्या प्रवेश निश्चिती बाबत होणाऱ्या नुकसानास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील. प्रवेश नियामक प्राधिकरण/राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून महाविद्यालयावर योग्य ती दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

c) विद्यार्थी व पालकांमध्ये Status Retention Form बाबत बरेच संभ्रम आहेत. त्यामुळे आपण खालीलप्रमाणे सूचना विद्यार्थ्यांना Status Retention Form भरताना द्याव्यात, असे सूचित करण्यात येत आहे.

" Status Retention Form म्हणजे जर विद्यार्थ्यास कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश मिळाला आणि त्या विद्यार्थ्यास जर पुढील निवड फेऱ्यांमध्ये प्रवेश बदल नको असेल तरच त्या विद्यार्थ्याने Status Retention Form भरणे गरजेचे असते. परंतु त्या विद्यार्थ्यास जर पुढील प्रवेश फेऱ्यांसाठी पात्र व्हायचे असेल तर त्याने Status Retention Form भरू नये. विद्यार्थ्याने निवड प्राप्त झालेल्या महाविद्यालयात प्रवेश घेतला आणि Status Retention Form भरला नाही तरच तो पुढील फेर्यांमधील बदलासाठी पात्र ठरतो. Status Retention Form भरला नाही आणि तो Betterment/Upgrade झाला नाही तर त्याचा त्या महाविद्यालयातील प्रवेश रद्द होत नसून सदरील प्रवेश कायम राहतो. Status Retention Form भरणे अनिवार्य नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. "

d) कोणत्याही महाविद्यालयाने निवड झालेल्या विद्यार्थ्याकडून Status Retention Form भरण्याची सक्ती करण्यात येवू नये.

e) Status Retention Form भरलेला विद्यार्थी आपला प्रवेश या कार्यालयाने ठरवून दिलेल्या विहित मुदतीत रद्द करू शकतो आणि सदर मुदत या कार्यालयातर्फे स्वतंत्र पणे जाहीर करण्यात येईल.

तरी आपणास कळविण्यात येते की, विद्यार्थी आपल्या महाविद्यालयात Status Retention Form सादर करावयास आल्यास त्याला उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे सूचित करावे व त्यानंतर त्याच्याकडून Status Retention Form भरून घ्यावा. तसेच जे विध्यार्थी Status Retention Form सादर करणार नाहीत त्यांना पुढील प्रवेश फेरीमध्ये भाग घेण्यासाठी ऑनलाईन प्रणालीमध्ये विहीत मुदतीत पसंती क्रमांक भरणे आवश्यक असल्याबाबत सूचीत करावे.

२०) या प्रक्रियेत **रुजू झालेल्या विद्यार्थी, रुजू न झालेल्या विध्यार्थी, प्रवेश रद्द केलेले विद्यार्थी आणि Status Retention Form सादर केलेले विद्यार्थी** यांची एकत्रित माहिती online पद्धतीने सादर करण्याकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून तयार करण्यात आलेल्या User Manual for Feedback Module मध्ये सादर करावी. महाविद्यालयांनी सदर User Manual for Feedback Module मध्ये उमेदवारांच्या प्रवेशाबाबत माहिती नियमित/दररोज विद्यार्थी प्रवेशास आल्यावर भरणे आवश्यक आहे.

२१) शेवटच्या दिवशी विहित वेळेत जे विद्यार्थी महाविद्यालयात report करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना Not Joined - Not Reported करावे, त्यानंतर अंतिम अहवाल Download करण्यात यावा, त्यावर मा.अधिष्ठाता/प्राचार्य यांचे सही व शिक्का घेऊन मूळ प्रत स्कॅन करून pdf file विहित वेळेतच upload करण्यात यावी.

२२) सदर माहिती संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश फेरीच्या अंतिम दिनांकाच्या विहित वेळेत तात्काळ राज्य सीईटी कक्षास सादर न केल्यास आपल्या महाविद्यालयाच्या रिक्त राहिलेल्या जागांची तसेच आपल्या महाविद्यालायाकडून अधिकच्या जागा भरल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील याची महाविद्यालयाने गांभीर्याने नोंद घ्यावी.

२३) शिष्यवृत्तीबाबत राज्य/केंद्र शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णयाप्रमाणे आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.

२४) महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या Ragging सदृश्य प्रकारांमध्ये झालेली वाढ लक्षात घेता अशा प्रकारांवर आळा घालण्याकरिता भारतीय आयुर्विज्ञान परिषद याचे मार्गदर्शक तत्वे व शासनाकडून देण्यता आलेल्या निर्देशानुसार व्यतिरिक्त ragging प्रतिबंध करावयाच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही यावी.

सहि/-
आयुक्त
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य मुंबई.

प्रत माहितीस्तव :-
१) मा. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
२) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई